प्रेस नोट

प्रती,

दि. २४.०४.२६

सर्व वार्ताहार/पत्रकार बांधव

शेगाव ग्रामिण पोलीसांनी १२ बोअरचे बंदुक व ०१ जिवंत ७० एमएमचे काडतुस केले हस्तगत

दि. २१.०४.२०२६ रोजी पोलीस स्टेशन शेगाव ग्रामिण येथे दरोडा घालण्याची पुर्वतयारी करून एकत्र जमलेले एकुण ०५ आरोपीतांना त्यांचे जवळील शस्त्र, मोटर सायकली, नगदी रोख व ईतर साहीत्यासह मिळुन आल्याने सदर प्रकरणी त्यांचेविरूध्द अप. क्र. १३५/२०२६ कलम ३१०(४), (५) भारतीय न्याय संहिता गुन्हा नोंद करण्यात येवुन त्यांना पोलीस स्टेशन शेगाव ग्रामिण कडुन अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचा तपास सुरू असतांना पिसीआर मध्ये असलेला आरोपी नामे जमील हुसेन ईनामुल्ला रा. बऱ्हाणपुर याने दि.२१.०४.२०२६ सेजी घटनेच्या वेळी त्याचे जवळ असलेली **१२ बोअर बंदुक** ही ग्राम जानोरी येथे घटनास्थळी लपवुन ठेवल्याबाबत सांगितल्याने सदरची बंदुक ही **एक ७०एमएमचे जिंवत काडतुससह** दि. २३.०४.२०२६ रोजी जप्ती कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच दि. २४.०४.२०२६ रोजी सदर गुन्हयात आरोपीतांनी बऱ्हाणपुर येथुन शेगाव येथे येण्यासाठी व त्यामध्ये १२ बोअर बंदुक आणण्यासाठी कारचा वापर केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने लाल रंगाची महीन्द्रा केयुवी १०० कार क्रमांक एम पी ६८ सी ४७८६ ही मिल्लत नगर शेगाव येथुन पिसीआर मधील आरोपी शरीफ अहमद शहीद अहमद रा. बऱ्हाणपुर यांचे कडुन जप्त करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही बुलडाणा जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री. निलेश तांबे, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. श्रेणीक लोढा, उपविभागिय पोलीस अधिकारी खामगाव श्री. प्रदीप पाटील यांचे व शेगाव ग्रामिण पोलीस स्टेशनचे ठाणेदार पो.नि. पितांबर जाधव यांचे मार्गदर्शनात तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक प्रविण लिंगाडे, पोहवा नंदकिशोर तिवारी ब.नं १६३६, पोहवा उमेश आखरे ब.नं १६१८, पोशि मंगेश पाटकर ब.नं २३२ यांनी केली आहे.

प्रभारी अधिकारी
पो.स्टे.शेगांव (ग्रा) जि.बुलडाणा